लिपिक टंकलेखक (पूर्व) परीक्षा - 2017

# A

2017 **Code : G09**

## प्रश्नपुस्तिका

**मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुद्धिमापन चाचणी व अंकगणित**

**वेळ : 1 (एक) तास** **एकूण प्रश्न : 100**

**एकूण गुण : 100**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण एखादा **प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

| QUESTION BOOKLET NO | |
|---|---|
| 233897 | |
| SEAL SEAL SEAL SEAL | |
| A | G09 |

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

[redacted]

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. पुढील वाक्यातील कोणत्या भाववाचक नामाचा विशेषनामासारखा उपयोग केला आहे ?
'विश्वास परीक्षेत उत्तीर्ण झाला'.
(1) उत्तीर्ण (2) परीक्षेत (3) झाला (4) विश्वास

2. पुढे काही शब्दांची स्त्रीलिंगी रूपे दिली आहेत.
पती-पत्नी, दीर-जाऊ, रेडा-म्हैस, तर खोंड- ?
(1) कालवड (2) भाटी (3) लांडोर (4) गाय

3. विचार, भावना, अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधन म्हणजे ________ होय.
(1) हातवारे (2) भाषा (3) लिपी (4) संवाद

4. मराठी भाषा लेखनासाठी ________ लिपीचा वापर करतात.
(1) देवनागरी (2) ब्राह्मी (3) सकळा (4) सुंदरा

5. ठरावीक क्रमाने आलेल्या अक्षरांच्या समूहातून एक विशिष्ट अर्थ व्यक्त होतो. त्याला ________ असे म्हणतात.
(1) वर्ण (2) स्वर (3) शब्द (4) वाक्य

6. 'वाङ्निश्चय' या शब्दाची संधी सोडवा.
(1) वाङ् + निश्चय (2) वाक् + निश्चय
(3) वाक + निश्चय (4) वाड् + निश्चय

7. जो विकारी शब्द नामाची व्याप्ति मर्यादित करतो त्यास ________ म्हणतात.
(1) सर्वनाम (2) क्रियापद (3) विशेषण (4) यापैकी काहीही नाही

8. जे शब्द आपल्या मनातील वृत्ती किंवा भावना व्यक्त करतात त्यांना ________ असे म्हणतात.
(1) क्रियाविशेषणे (2) शब्दयोगी (3) उभयान्वयी (4) केवलप्रयोगी

9. 'विद्वान' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप ओळखा.
(1) पंडिता (2) विदुषी
(3) हुषार (4) यापैकी काहीही नाही

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

10. 'तो निजत असेल' – या विधानातील काळ ओळखा.
(1) भूतभविष्य काळ
(2) वर्तमानभविष्य काळ
(3) भविष्यभविष्य काळ
(4) यापैकी एकही नाही

11. पुढीलपैकी विजातीय स्वर कोणते ?
(1) इ-ई
(2) उ-ऊ
(3) उ-ए
(4) अ-आ

12. पुढीलपैकी अल्पप्राण व्यंजन कोणते ?
(1) क्, ग्
(2) छ्, झ्
(3) थ्, ध्
(4) फ्, भ्

13. पुढील विधाने वाचून योग्य उत्तर निवडा.

अ. 'अट' या शब्दातील 'अ' या स्वराचा उच्चार लांबट आहे.

ब. 'अडका' या शब्दातील 'अ' या स्वराचा उच्चार ऱ्हस्व आहे.

(1) अ बरोबर आणि ब चूक
(2) अ चूक आणि ब बरोबर
(3) अ आणि ब बरोबर
(4) अ आणि ब चूक

14. 'विद्यार्थी' या जोडशब्दातील पोट शब्द कोणते ते सांगा.
(1) विद्य + आर्थी
(2) विद्या + अर्थी
(3) विद्या + आर्थी
(4) विद्या + र्थी

15. पुढील वाक्यातील सर्वनाम कोणते ते सांगा.
ती मुलगी चांगली गाते.
(1) मुलगी
(2) ती
(3) गाते
(4) चांगली

16. 'जळू' या शब्दाचे अनेकवचन लिहा.
(1) जळूवे
(2) जळवा
(3) जळये
(4) यापैकी एकही नाही

17. नामाच्या ठिकाणी जो संख्या सुचविण्याचा धर्म आहे त्याला काय म्हणतात ?
(1) संख्याविशेषण
(2) वचन
(3) सामान्यनाम
(4) सामान्यरूप

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

18. 'गायरान' या शब्दाचे लिंग ओळखा.
(1) पुल्लिंग (2) स्त्रिलिंग (3) नपुंसकलिंग (4) यापैकी नाही

19. 'कोण', 'काय' ही सर्वनामे खालील कोणत्या प्रकारांत येतात ?
(1) प्रश्नार्थक व अनिश्चित (2) दर्शक व संबंधी
(3) पुरुषवाचक व अनिश्चित (4) दर्शक व प्रश्नार्थक

20. जोड्या जुळवा :
अ. क्रमवाचक संख्या विशेषणे — I. दसपट, दुहेरी
ब. आवृत्तीवाचक संख्या विशेषणे — II. चौथा, सप्तमी
क. गणवाचक संख्या विशेषणे — III. थोडी, सर्व
ड. अनिश्चित संख्या विशेषणे — IV. अर्धा, साठ

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | IV | III | I |
| (2) | IV | I | II | III |
| (3) | III | I | IV | II |
| (4) | II | I | IV | III |

21. व्यंजनात __________ मिळवून अक्षर तयार होते.
(1) वर्ण (2) शब्द (3) अनुस्वार (4) स्वर

22. मराठी वर्णमालेत एकूण __________ वर्ण आहेत.
(1) 48 (2) 46 (3) 36 (4) 26

23. कर्तरी प्रयोगात __________ आपली हुकूमत चालवितो.
(1) कर्म (2) कर्ता (3) लिंग (4) वचन

24. षष्ठी बहुव्रीही समासाचे उदाहरण ओळखा.
(1) जितेंद्रिय (2) गजानन (3) महात्मा (4) दशमुख

25. 'आरती सुरु झाली आणि घंटानाद सुरु झाला' – वाक्यप्रकार ओळखा.
(1) संयुक्त वाक्य (2) केवल वाक्य (3) मिश्र वाक्य (4) विधानार्थी

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

26. Select the appropriate word to fill in the blank :
The pupils were making __________ in the class when the teacher entered.
(1) Noise (2) Sound (3) Voice (4) Talk

27. Fill in the blanks with correct articles :
a. We are going to London by ________ train.
b. We enjoyed __________ breakfast she gave us.
c. London is on ____________ Thames.

(1) No article, the, the
(2) a, no article, the
(3) the, the, the
(4) the, the, no article

28. Choose the correct sentences.
a. This room is much large.
b. He drives very carefully.
c. This room is very larger than the other.

(1) a only (2) b only (3) b and c only (4) a, b and c

29. Choose the correct sentences.
a. Tell me where your book is.
b. Tell me where is your book.
c. He asked me where was my book.

(1) a and c only
(2) b and c only
(3) a only
(4) a, b and c

30. The following sentence is divided into four parts (a, b, c and d). One of which contains an error. Spot the error and mark that part as an answer :
Most of/the five years/plans of India/have been successful.
a b c d
(1) Most of
(2) the five years
(3) plans of India
(4) have been successful

31. Choose the word having meaning opposite to that of the word in capital.
I had to RESTRAIN myself from telling him what I thought of him.
(1) Considerate
(2) Liberate
(3) Silent
(4) Restrict

32. Match the following :

a. Give the game away — i. Emit
b. Give in — ii. Reveal
c. Give off — iii. Distribute
d. Give out — iv. Surrender

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | i | ii | iv |
| (2) | ii | iv | i | iii |
| (3) | ii | iv | iii | i |
| (4) | i | iv | ii | iii |

33. Fill in the blank with the correct expression :
This illness __________ of my holiday plans.
(1) Makes a mass
(2) Makes a moss
(3) Makes a mess
(4) Makes a massive

34. Change the sentence into exclamatory sentence.
It was a very long and colourful journey.
(1) It was a very colourful and long journey !
(2) It was a very long and colour journey !
(3) What a very long and colourful journey it was !
(4) Was it a very long and colourful journey !

35. Change into interrogative sentence.
India's glory can never fade.
(1) Can India's glory ever fade ?
(2) India glory can never fade ?
(3) Glory of India can fade ?
(4) Can't fade India glory ?

36. Remove 'too' from the following sentence.
It is never too late to improve oneself.
(1) It is too late to improve oneself.
(2) It is never so late that one cannot improve oneself.
(3) It is late that one cannot improve oneself.
(4) Is it late that one cannot oneself improve.

37. Which one of the following is the correct passive form of
Did you write a letter ?
(1) Were a letter written by you ?
(2) Had a letter written by you ?
(3) Was a letter written by you ?
(4) Is a letter written by you ?

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**38.** Change the following sentence into comparative degree.
Iron is the most useful of all metals.
(1) Iron is more useful than any other metal.
(2) No other metal is more useful than Iron.
(3) Iron are most useful metal.
(4) No other metal is as useful as Iron.

**39.** Fill in the blanks using modals from answer options :
a. I ________ meet you on Friday as I am out of station on Thursday.
b. You ________ carry your hall ticket in the examination room.
c. As I was sick yesterday I ________ attend the meeting.

(1) shall ; must ; couldn't
(2) couldn't ; must ; shall
(3) must ; couldn't ; shall
(4) couldn't ; shall ; must

**40.** Choose the word that is nearly the same meaning as the word given in capital.
RESOLUTE
(1) Solution (2) Steady (3) Dangerous (4) Stout

**41.** Choose the word opposite in meaning to the given word.
ILLUSORY
(1) Deceptive (2) Real (3) Imaginary (4) Certain

**42.** Complete the following sentence using the correct choice :
<u>Hear</u> is related to <u>deaf</u> in the same way as <u>speak</u> is related to ________
(1) quiet (2) silent (3) mum (4) dumb

**43.** Choose the incorrectly spelt word.
a. Edible b. Nutrient c. Leniente d. Domination

(1) a (2) c (3) b (4) d

**44.** Identify the correctly spelt words.
a. Matrimoney b. Frivolous c. Euphimism

(1) a and c only (2) b only (3) b and c only (4) a, b and c

**45.** Choose the correctly spelt word.
a. Occurence b. Occurance c. Occurrence d. Occurrance

(1) a (2) b (3) c (4) d

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

46. खालीलपैकी कोणत्या व्यक्तीचा 27 फेब्रुवारी हा जन्मदिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो ?
(1) कृष्णाजी केशव दामले ऊर्फ केशवसुत
(2) राम गणेश गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज
(3) वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज
(4) त्र्यंबक बापुजी ठोंबरे ऊर्फ बालकवी

47. सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी खालीलपैकी कोणत्या संस्थेची स्थापना केली ?
(1) प्रार्थना समाज
(2) सत्यशोधक समाज
(3) आर्य समाज
(4) ब्राम्हो समाज

48. नुकताच पुन्हा एकदा जागृत झालेला भारतातील एकमेव जिवंत ज्वालामुखी __________ या ठिकाणी आहे.
(1) दिब्रुगड
(2) अंदमान-निकोबार
(3) लक्ष्यद्विप
(4) तवांग

49. दि. 15 फेब्रुवारी 2017 रोजी तब्बल 104 उपग्रहांचे अवकाशात प्रक्षेपण करून इस्रोने जागतिक विक्रमाची नोंद केली. यापूर्वी हा विक्रम कोणत्या देशाच्या नावावर किती उपग्रहांसाठी होता ?
(1) अमेरिका 20 उपग्रह
(2) रशिया 20 उपग्रह
(3) अमेरिका 37 उपग्रह
(4) रशिया 37 उपग्रह

50. खालील विधाने विचारात घ्या.
अ. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची स्थापना 1984 मध्ये झाली.
ब. "आर्यभट्ट" हा भारताचा पहिला उपग्रह होता.
क. इस्रोने चांद्रयान व मंगळयान मोहिमा यशस्वी केल्या आहेत.
ड. 15 फेब्रुवारी 2017 रोजी इस्रोने 104 उपग्रह अवकाशात सोडून जागतिक विक्रम नोंदविला.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?
(1) अ, ब आणि क
(2) अ, क आणि ड
(3) ब, क आणि ड
(4) अ, ब आणि ड

51. पद्मश्री किताब 2017 च्या संदर्भात खालील जोड्या जुळवा.

| अ (पुरस्कार विजेता) | ब (क्षेत्र) |
|---|---|
| अ. श्रीमती अरुणा मोहंती | I. सनदी सेवा |
| ब. श्री. टि. के. विश्वनाथन | II. नृत्य कला |
| क. श्रीमती एली अहमद | III. क्रीडा |
| ड. श्रीमती दीपा मलिक | IV. साहित्य आणि शिक्षण |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | II | I | IV | III |
| (3) | III | IV | II | I |
| (4) | IV | III | II | I |

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**52.** खालील विधाने विचारात घ्या.

अ. संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना 24 ऑक्टोबर 1945 रोजी झाली.
ब. संयुक्त राष्ट्र संघटनेचे मुख्यालय वॉशिंग्टन येथे आहे.
क. संयुक्त राष्ट्र संघटनेचे सद्यास्थितीत 193 देश सभासद आहेत.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?

(1) अ आणि ब (2) ब आणि क (3) अ आणि क (4) अ, ब आणि क

---

**53.** खालील विधाने विचारात घ्या.

अ. भारताच्या राष्ट्रपतींची निवड लोकसभा व राज्यसभेच्या सदस्यांकडून केली जाते.
ब. भारताचे राष्ट्रपती लोकसभा बरखास्त करू शकतात.
क. भारताचे राष्ट्रपती संसदेला संबोधीत करू शकतात.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?

(1) अ आणि ब (2) ब आणि क (3) अ आणि क (4) अ, ब आणि क

---

**54.** 2014 मध्ये 'स्वच्छ भारत अभियान' (Swachh Bharat Abhiyan) उपक्रमाची सुरुवात कोणत्या राष्ट्रपुरुषाच्या जयंती (Birth Anniversary) पासून करण्यात आली ?

(1) महात्मा गांधी
(2) पं. जवाहरलाल नेहरू
(3) सरदार वल्लभभाई पटेल
(4) दादाभाई नौरोजी

---

**55.** निळी क्रांती कशाशी संबंधित आहे ?

(1) मत्स्य उत्पादन
(2) अन्नधान्य उत्पादन
(3) रेशीम उत्पादन
(4) पेट्रोलियम (खनिज) उत्पादन

---

**56.** __________ हे पहिले मराठी वृत्तपत्र आहे.

(1) केसरी (2) सुधारक (3) मराठा (4) दर्पण

---

**57.** संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना कोणत्या ठिकाणच्या संमेलनामध्ये करण्यात आली होती ?

(1) मुंबई (2) ठाणे (3) बेळगाव (4) कोल्हापूर

---

**58.** भारत देशातील कोणत्या संस्थानात प्रथमत: सर्व जातीधर्माच्या मुलांच्यासाठी वसतीगृहे सुरु करण्यात आली ?

(1) सातारा (2) कानपूर (3) कोल्हापूर (4) उदयपूर

---

**59.** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कोण बनले होते ?

(1) मोरारजी देसाई (2) यशवंतराव चव्हाण (3) वसंतराव नाईक (4) शंकरराव चव्हाण

---

**60.** __________ या इंग्रज अधिकाऱ्याचा खून चाफेकर बंधुनी केला.

(1) एल्फिन्स्टन (2) रँड (3) जॅकसन (4) वाबली

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

61. परभणी जिल्हयाला कोणत्या जिल्ह्याची सीमा नाही ?
(1) हिंगोली (2) जालना (3) बीड (4) औरंगाबाद

62. __________ राज्यातील मुझफ्फरपूर येथून साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते.
(1) बिहार (2) पश्चिम बंगाल (3) उत्तर प्रदेश (4) मध्य प्रदेश

63. __________ व __________ या नद्याचा संयुक्त प्रवाह नेवासा येथे गोदावरी नदीस मिळतो.
अ. मुळा व मुठा
ब. मुळा व प्रवरा
क. प्रवरा व वैनगंगा
ड. इंद्रायणी व निरा
(1) अ फक्त बरोबर (2) अ आणि क बरोबर
(3) ब फक्त बरोबर (4) ड फक्त बरोबर

64. महाराष्ट्रातील __________ ही सर्वात लांब नदी आहे.
(1) कृष्णा (2) तापी (3) वैनगंगा (4) गोदावरी

65. मृदासंवर्धणासाठी कोणकोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे ?
अ. वृक्षारोपन
ब. पायऱ्या पायऱ्याची शेती
क. पूरनियंत्रण
ड. वाळवंटीकरण
(1) अ आणि ब पर्याय बरोबर (2) अ, ब आणि क पर्याय बरोबर
(3) ब आणि ड पर्याय बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर

66. खालील अंकमालिका पूर्ण करा.
0, 7, 26, 63, ____
(1) 125 (2) 126 (3) 124 (4) 98

67. खालीलपैकी कोणता अंक प्रश्नचिन्हाच्या जागी येईल ?




(1) 58 (2) 53 (3) 49 (4) 45

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**68.** प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी खालीलपैकी सुसंगत पर्याय निवडा.

$\frac{5}{36} : \frac{7}{64} :: \frac{9}{100} : ?$

(1) $\frac{13}{169}$ (2) $\frac{11}{144}$ (3) $\frac{11}{121}$ (4) $\frac{12}{128}$

---

**69.** डॅनी एका व्यक्तीच्या रंगीत तैलचित्राकडे निर्देशन करत म्हणाला, ''त्याचे वडील हे माझ्या वडिलांचा मुलगा आहेत.'' जर यातल्या 'मी' ला एकही भावंड नसेल तर चित्रातील व्यक्तीचे या संबंधातील 'मी' शी नाते काय ?

(1) भाऊ (2) मुलगा (3) काका (4) वडील

---

**70.** एका संकेतानुसार 1, 2, 3 या सर्व अंकांची किंमत एक आहे, तसेच 4, 5, 6 या सर्व अंकांची किंमत दोन आहे, आणि 7, 8 व 9 या सर्व अंकांची किंमत तीन आहे. शून्याची किंमत शून्य आहे. त्यानुसार पुढील राशीची किंमत निवडा.

$\sqrt{(36\times90)-(50\times30)+(84\times9)} = ?$

(1) 13 (2) 15 (3) 16 (4) 18

---

**71.** सर्व विचारवंत साहित्यिक आहेत. काही साहित्यिक शिक्षक आहेत. या माहितीच्या आधारे अधिक ग्राह्य विधानाचा पर्याय निवडा.

(1) सर्व साहित्यिक विचारवंत आहेत
(2) सर्व शिक्षक विचारवंत आहेत
(3) काही साहित्यिक शिक्षक नाहीत
(4) सर्व शिक्षक साहित्यिक आहेत

---

**72.** खालील आकृती अभ्यासून प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या लिहा.

| | | |
|---|---|---|
| 78 | 15 | 6 |
| 94 | 13 | 4 |
| 59 | 14 | ? |

(1) 3 (2) 5 (3) 7 (4) 9

---

**73.** पुढे काही भिन्न आकारांचा उपयोग करून वेन आकृती काढली आहे व त्यात एक ठिपका विशिष्ट संयोग संच निर्देशित करण्यासाठी दाखवला आहे. पर्यायांतील हा संच निर्देशित करण्यासाठी उपयुक्त नसणारी आकृती निवडा.



(1)  (2)  (3)  (4) 

---

**74.** जर BC = 2524, PO = 1112, XY = 32 तर UV = ?
(1) 62 (2) 63 (3) 64 (4) 65

**75.** जर 2 x 8 = 4, 3 x 15 = 5 आणि 4 x 32 = 8 तर 5 x ? = 7
(1) 15 (2) 35 (3) 100 (4) 7

**76.** एका सांकेतिक भाषेत MARCH हा शब्द NZIXS असा लिहीला तर त्याच सांकेतिक भाषेत AUGUST हा शब्द कसा लिहाल ?
(1) ZPZFGX (2) ZPXGHF (3) ZFTFHG (4) ZPXFXG

**77.** एका सांकेतिक भाषेत संकेत 684 हा "bring cold water" प्रतिरूपित करतो. 453 हा संकेत "water is good" प्रतिरूपित करतो. आणि 237 हा संकेत "bright good boy" प्रतिरूपित करतो. तर याच संकेत प्रणालीनुसार "boy is bright" साठीचा संकेत कोणता ?
(1) 572 (2) 752 (3) 648 (4) 653

**78.** खालील उदाहरणात * चिन्हाच्या जागी कोणता अंक असेल ?

  2 * 6
+ 3 * 2
+ 1 4 9
  7 * 7

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

**79.** X हा Y चा मुलगा आहे. P ही Y ची सासू आहे. Q ही R ची मुलगी आहे व X ची बायको आहे. तर Y चे Q शी नाते काय असेल ?
(1) सासू (2) बहिण (3) नणंद (4) भाऊ

**80.** इंग्रजी विषयात रामला श्यामपेक्षा 8 गुण कमी मिळालेत तर रमणला 67 गुण मिळालेले आहेत. अक्षयला श्यामपेक्षा 5 गुण कमी परंतु रमणपेक्षा 4 गुण जास्त मिळालेले आहेत तर रामला इंग्रजी विषयात किती गुण मिळालेले आहेत ?
(1) 67 (2) 68 (3) 69 (4) 70

**81.** एका मॉलमध्ये गुप्तता राखण्यासाठी वस्तूच्या किंमती दर्शविण्यासाठी सांकेतिक लिपीचा वापर केला.

FIND BYZEAL
1234 567890

काही अपरिहार्य कारणामुळे ती सांकेतिक लिपी पुढीलप्रमाणे बदलावी लागली.

WRITESABLY
1234567890

नव्या सांकेतिक लिपीनुसार एका वस्तूची किंमत E A L अशी असल्यास जुन्या सांकेतिक लिपीनुसार ती कशी दाखवली असेल ?
(1) BAZ (2) BLY (3) BLZ (4) BZA

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**82.** 2005 सालचा महिला-दिन बुधवारी आला होता. 2004 सालचा महिला-दिन आठवड्यातील ज्या दिवशी आला होता तो दिवस निर्देशित करणारा पर्याय निवडा.
(1) सोमवार (2) मंगळवार (3) गुरुवार (4) शुक्रवार

**83.** खाली एक विधान आणि त्यापुढे I आणि II ही गृहीतके दिलेली आहेत. विधान वाचून त्यातून अंतर्निहित गृहीतकाबाबतचा पर्याय निश्चित करा.
**विधान :** भारतातील साखर कारखान्यांची संख्या जरी वाढत असली, तरी अजून आपण साखर आयात करतो.
**गृहीतके :** I. भारतातील प्रत्येक व्यक्तीगणिक साखरेचा वापर वाढत आहे.
II. बरेच साखर कारखाने त्यांच्या संपूर्ण क्षमतेएवढे साखर उत्पादन करण्याच्या स्थितीमध्ये नाहीत.
(1) गृहीतक I अंतर्निहित आहे (2) गृहीतक II अंतर्निहित आहे
(3) गृहीतके I आणि II दोन्ही अंतर्निहित आहेत (4) गृहीतके I आणि II दोन्ही अंतर्निहित नाहीत

**84.** खालील संख्यामालेमध्ये एक संख्या विसंगत आहे. ती विसंगत संख्या कोणती ?
संख्यामाला – 3, 5, 7, 9, 11, 13.
(1) 3 (2) 5 (3) 7 (4) 9

**85.** जर THOUGHTFULESSNESS या अक्षरसमूहातील पहिली 6 वर्णाक्षरे उलट्या क्रमाने लिहिली व त्यानंतरची 6 वर्णाक्षरे तशीच कायम ठेवून उर्वरीत वर्णाक्षरे उलट्या क्रमाने लिहिली तर या नवीन वर्णमालेतील मधले वर्णाक्षर कोणते असेल ?
(1) S (2) L (3) U (4) N

**86.** जर 'A' चा पगार 'B' पेक्षा 20% कमी असेल तर 'B' चा पगार 'A' पेक्षा किती टक्याने जास्त आहे ?
(1) 10% (2) 20% (3) 25% (4) 80%

**87.** जर खरेदीची किंमत विक्रीच्या किंमतीच्या 80% असेल, तर किती टक्के फायदा होईल ?
(1) 20% (2) 25% (3) 30% (4) 50%

**88.** 0.15 + 3.14 + 31.4 = ?
(1) 6.43 (2) 346.9 (3) 34.69 (4) 64.3

**89.** आशाला एका परीक्षेत पास होण्यासाठी 40% गुणांची गरज असते. तिला 210 गुण मिळतात. तिला पास होण्यासाठी लागणाऱ्या गुणांपेक्षा 10 गुण अधिक मिळतात, तर परीक्षेतील अधिकाधिक गुण किती ?
(1) 1000 (2) 500 (3) 250 (4) 300

**90.** तीन क्रमवार विषम संख्यांची बेरीज जर त्या संख्यांच्या सरासरीपेक्षा 38 ने जास्त असल्यास त्यापैकी शेवटची संख्या कोणती ?
(1) 17 (2) 21 (3) 25 (4) यापैकी नाही

**91.** मकरंदने त्याच्या मासिक वेतनाच्या 5% रक्कम मुच्युअल फंडामध्ये गुंतवण्याचे ठरविले. परंतु प्रत्यक्ष गुंतवणुकीच्या वेळेस त्याने ठरलेल्या रकमेऐवजी रु. 1,500 ची गुंतवणुक केली जी रक्कम त्याने ठरविलेल्या रकमेच्या 75% एवढी होती. तर मकरंदचे मासिक वेतन किती ?
(1) रु. 38,500 (2) रु. 40,000 (3) रु. 42,500 (4) रु. 45,000

**92.** जर $2^x = \sqrt[3]{32}$ तर $x = ?$
(1) 5 (2) 3 (3) $\frac{3}{5}$ (4) $\frac{5}{3}$

**93.** $\dfrac{6^{\frac{2}{3}} \times \sqrt[3]{6^7}}{\sqrt[3]{6^6}}$ ची किंमत काढा.
(1) 1 (2) 12 (3) 6 (4) 36

**94.** जर एखाद्या संख्येचा 50% व त्याच संख्येचा 35%, हा जर 12 नी कमी असेल तर ती संख्या कोणती ?
(1) 40 (2) 50 (3) 60 (4) 80

**95.** तीन संख्याची बेरीज 264 आहे. जर पहिली संख्या दुसऱ्या संख्येच्या दुप्पट असेल व तिसरी संख्या पहिल्या संख्येच्या $\frac{1}{3}$ असेल तर दुसरी संख्या ____________ आहे.
(1) 64 (2) 72 (3) 84 (4) 96

**96.** एका वर्गातील 15 विद्यार्थ्यांचे सरासरी वय 15 वर्षे आहे. त्यापैकी 5 विद्यार्थ्यांचे सरासरी वय 14 वर्षे व 9 विद्यार्थ्यांचे सरासरी वय 16 वर्षे असल्यास, राहिलेल्या 15 व्या विद्यार्थ्यांचे वय किती ?
(1) 13 वर्षे (2) 12 वर्षे (3) 11 वर्षे (4) 15 वर्षे

**97.** ताशी सरासरी 45 कि.मी. वेगाने जाणारी बस निर्धारित ठिकाणी निर्धारित वेळेत पोहोचते. जर ती बस ताशी सरासरी 54 कि.मी. वेगाने गेल्यास ती निर्धारित वेळेपेक्षा 20 मिनिटे लवकर पोहोचते; तर तिने कापावयाचे एकूण अंतर किती ?
(1) 85 कि.मी. (2) 90 कि.मी. (3) 105 कि.मी. (4) 120 कि.मी.

**98.** एका गावात 2200 मतदार आहेत. 483 पुरुष व 277 महिलांनी मतदानात भाग घेतला नाही तर एकूण किती मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला ?
(1) 760 (2) 1290 (3) 1677 (4) 1440

**99.** 5 महिलांचे सरासरी वजन 40 किलो आहे. सरिताचे वजन मिळवल्यास सरासरी 2 ने कमी होते. तर सरिताचे वजन किती ?
(1) 28 किलो (2) 38 किलो (3) 30 किलो (4) 42 किलो

**100.** एका दुध संकलन केंद्रावर दररोज 1200 लिटर दुधाची आवक होते. रोज 25 व्यक्ती प्रत्येकी दहा लिटर दुध केंद्रावरून घेऊन जातात. तर केंद्रावर किती दुध शिल्लक राहिल ?
(1) 250 लिटर (2) 1175 लिटर (3) 950 लिटर (4) 1225 लिटर

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा राहणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) घाबरून जाणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

QUESTION BOOKLET NO 233897
SEAL SEAL SEAL

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK